# परब्रह्म रूपिणी माते महालक्ष्मी जय जय जय

परब्रह्म रूपिणी माते महालक्ष्मी जय जय जय

सुखकारिणी भव दु: ख निवारिणी
पाप नाशिनी जय जय जय
परब्रह्म रूपिणी माते
महालक्ष्मी जय जय जय

ब्रह्मादिक तुज ध्याती
गुण संकिर्तन करिती
सुरवर अवघे संकट काळी
तुझ्याच नामे तरती
भक्तजना वर निज छाया धरी
हे भुवनेश्वरी जय जय जय
परब्रह्म रूपिणी माते
महालक्ष्मी जय जय जय

रत्नमण्यांची कांती
राजस वदना वरती
गरुडारूढ जगन्मातेची
भव्य शोभते मूर्ति
बैस येऊनी ह्रदय आसनी
हे जग जननी जय जय जय
परब्रह्म रूपिणी माते
महालक्ष्मी जय जय जय

प्रणव रूपिणी जय जय जय

https://bhajanganga.com/bhajan/lyrics/id/20273/title/parbhrma-rupini-maate-mahalakshmi-jai-jai-jai

अपने Android मोबाइल पर BhajanGanga App डाउनलोड करें और भजनों का आनंद ले |